# St. Joseph College of Arts & Commerce, Satpala

## <u>Institutional Distinctiveness- 2018-19</u>

7.3.1: Each institution has its own distinctive vision, priority and thrust .Our Institution has priotized their vision on spread of higher education in the vicinity. NSS unit of college has taken initiative and opened three libraries in three tribal areas namely Paradhi pada , Gowari pada and Navapur. Orientation  through regular awareness classes is done among the local folk.

Aims and objectives:

1. To promote literacy.
2. To encourage lifelong learning.
3. To enrich personal and professional lives of people
4. To provide materials that will stimulate students' acquisition of factual knowledge.

The Department of NSS of St Joseph College of Arts and Commerce along with its regular extension work has taken a new initiative and has started three libraries at Paradhi pada , Gowari pada and Navapur.  The stated villages are located near college and the people in these villages are poor and landless labourers. These libraries are started with the initiative of NSS program Officers and volunteers. The intention of the activity was to inculcate reading habits among the natives. In order to start these libraries many generous people donated books as well contributed monetary funds. All NSS students were very excited for this noble cause. Villagers were overjoyed at this project.

Outcome:

1. Natives started taking interest in reading.

2. Reading habit of the people has been developed.

3. The reading imbibed values in the mind of people.



# सेंट जोसेफ महाविद्यालयाने सुरू केले तिसरे वाचनालय

विरार/विशेष प्रतिनिधी



ज्ञानदीप मंडळ संचलित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, सत्पाळा, विरार (प.) यांच्यावतीने नवापूर या गावात नुकतेच 'प्रबोधन' वाचनालय सुरु करण्यात आले.उदघाटन प्रसंगी बोलताना वटार ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अनंत पाटील म्हणाले, महाविद्यालयाने वाचनालय सुरु करून नवापूर गावात एक नवीन पर्व सुरू केले आहे. आता आमची जबाबदारी आहे की आम्ही या वाचन संस्कृतीचा विस्तार करायला हवा. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत असताना सेंट जोसेफ महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख आणि पालघर जिल्हा एन. एस. एस. समन्वयक प्रा. जगदीश संसारे म्हणाले, गावागावात वाचनालय सुरु करण्याचा विचार मुंबई विद्यापीठ एन. एस. एस. विभागाचे संचालक पुराणिक यांनी मांडला. आम्ही त्यांच्या सुचना अंमलात आणत आहोत.आज ५८ पुस्तके घेऊन सुरू केलेल्या या वाचनालयात लवकरच ५००पुस्तके जमा होतील. महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि एन. एस.एस. विभागाने संयुक्तपणे या वाचनालयाची उभारणी केली.सदर प्रसंगी ग्रंथपाल डॉ.दिनेश सनदी आवर्जून उपस्थित होते ते म्हणाले देवाच्या मंदिरात आज वाचनमंदिर सुरूझाले, याचा अभिमान वाटत आहे.तसेच जान्हवी मेहेर, राहुल डायस, मानसी चाचुल्या हे मराठी भाषाप्रेमी विद्यार्थी देखील हजर राहिले होते.वाचनालय सुरू करण्यात कौशिक म्हात्रे यांच्या सिंहाचा वाटा आहे. प्राचार्य डॉ.विन्सेंट डिमेलो यांचेही मार्गदर्शन मोलाचे ठरले. ज्ञानदीपमंडळाचे चेअरमन बावतिस ब्रिटो यांना हा उपक्रम खूपच आवडला त्यांनी ४ वाचनालयात २ वर्तमानपत्रे उपलब्ध करुनदेण्याचे आश्वासन दिले. भूषण मेहेर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रवीण तरे यांनी आभार मानले. जिज्ञेश मेहेर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

sakal epaper - Google Se
Sakal Epaper | Mumbai,P
Online Library Manageme
Inbox (13,36
FlashClient/Client_Panel.aspx#currPage=1



सकाळ

# नवापुरात प्रबोधन वाचनालय सुरू



नवापूर गावातील वाचनालयाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मान्यवर.

विरार, ता. ३० (बातमीदार) : ज्ञानदीप मंडळ संचालित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय, सत्पाळा, विरार (प.) यांच्यातर्फे नवापूर गावात नुकतेच 'प्रबोधन' वाचनालय सुरू करण्यात आले.

वटार ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अनंत पाटील यांच्या हस्ते वाचनालयाचे उद्घाटन झाले. सेंट जोसेफ महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख आणि पालघर जिल्हा एन. एस. एस. समन्वयक प्रा. जगदीश संसारे अध्यक्षस्थानी होते.

'महाविद्यालयाने वाचनालय सुरू करून एक नवीन पर्व सुरू केले आहे. वाचनसंस्कृतीचा विस्तार करण्याची जबाबदारी येथील नागरिकांची आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

प्रा. संसारे म्हणाले, महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि एन.एस.एस. विभागाने संयुक्तपणे या वाचनालयाची उभारणी केली आहे. आज ५८ पुस्तके घेऊन सुरू केलेल्या या वाचनालयात लवकरच ५०० पुस्तके जमा होतील.

ज्ञानदीप मंडळाचे अध्यक्ष बावतिस ब्रिटो यांनी वाचनालयात वर्तमानपत्रे देण्याचे आश्वासन दिले. या वेळी ग्रंथपाल डॉ. दिनेश सनदी, जान्हवी मेहेर, राहुल डायस, मानसी चाचुल्या हे विद्यार्थी उपस्थित होते. वाचनालय सुरू करण्यात कौशिक म्हात्रे यांनी मोलाची भूमिका बजावली. प्राचार्य डॉ. विन्सेंट डिमेलो यांचेही मार्गदर्शन मोलाचे ठरले.

भूषण मेहेर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले; तर प्रवीण तरे यांनी आभार मानले. जिज्ञेश मेहेर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

Mumbai, Palghar-Today
01/10/2019 Page No. 3

.